QP code 00006907

[वेळ : ३ तास] **[गुण : १००]**

कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.

सूचना : १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.

३. प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.

प्र. १ अ. सी. एफ. हॉकेट यांनी सांगितलेल्या मानवी भाषेच्या लक्षणांचा आढावा घ्या. **२०**

किंवा

ब. भाषेच्या व्याख्या देऊन रोमान याकोबसन यांनी भाषेची कोणकोणती कार्ये सांगितलेली आहेत ती नमूद करा.

प्र. २ अ. समाज-भाषा-संस्कृती यांच्यातील संबंधाचे विश्लेषण सपीर आणि वोर्फ यांचा 'सापेक्षतावादी सिद्धांताच्या' आधारे करा. **२०**

किंवा

ब. भाषिक ऱ्हास संकल्पना सांगून भाषिक ऱ्हासाच्या विविध अवस्था व भाषिक ऱ्हासाची कारणे नोंदवा.

प्र.३ अ. 'प्रमाणभाषा' ही संकल्पना सविस्तर सांगून प्रमाणभाषा आणि बोली यांच्यातील फरक नोंदवा. **२०**

किंवा

ब. 'बोली' या संकल्पनेचे विवेचन करून बोली अभ्यासाच्या विविध साधनांची ओळख करून द्या.

प्र.४ प्रत्येक गटातील **एक टीप लिहा. (एकूण तीन)** **३०**

अ. १. मानवाचे भाषिक संप्रेषण

किंवा

२. मानवेतरांचे संप्रेषण- स्टिकलबॅक मासा

ब. १. भाषा आणि समाजभाषाविज्ञान

किंवा

२. भाषेच्या प्रगतीचे निकष

XSAGARDADMINYB67106XSAGARDADMINYB67106

QP code 00006907

क. १. बोलींविषयीचे विविध गैरसमज

किंवा

२. बोलींसमोरील आव्हाने, जतन व संवर्धन

प्र.५ पुढील प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही पाच) **१०**

१. कोणत्या वर्षीच्या आर्थिक धोरणात भारताने खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या त्रिसूत्रीचा स्वीकार केला?
२. मानवी भाषेतील कोणत्या गुणामुळे अनेक भाषांमधील समान ध्वनीचे अर्थ भिन्न भिन्न असतात?
३. टाळीचा आवाज, खाकरणे, शिळ घालणे या मानवी भाषेतील ध्वनीचे स्वरूप काय आहे?
४. 'भाषा जपण्याचा हक्क' मानवी हक्कांच्या सनदेत कोणत्या देशाने घातला?
५. स्वभाषा बदलणे आणि नवभाषा आत्मसात करण्याची प्रक्रिया कशासाठी कारणीभूत आहे?
६. भाषिक ध्रूविकरण निर्माण होण्याचे मुख्य कारण कोणते ?
७. प्रमाण बोलीतील 'डोळा' हा शब्द वऱ्हाडी भाषेत कसा बोलला जातो?
८. 'संस्कृती' ही संकल्पना स्पष्ट करणारी कोणतीही एक व्याख्या द्या.
९. "दैनंदिन व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट भाषेस बोली असे म्हणता येईल" असे मत कोणी मांडले?

****

XSAGARDADMINYB67106XSAGARDADMINYB67106